Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – 422 222
Ph.- 0253-2231714,15,2230580, e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र. यचममुवि/विसेवि/2022/186 दिनांक- 07/07/2022

# सुचना पत्र क्र. ३

## बी.एड. प्रवेशच्छूक अध्ययनार्थीना प्रवेश अर्ज कागदपत्र पडताळणी संदर्भातील सूचना

नमस्कार,

सर्व बी.एड प्रवेशेच्छूकांना कळविण्यात येते की आपण Online भरलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारांच्या जिल्हा व प्रवर्गनिहाय कागदपत्र पडताळणी याद्या (Documents Verification List) संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रथम पडताळणी विभागीय केंद्रावर पार पडलेली आहे.

परंतू काही अभ्यासकेंद्रांवरील जागा रिक्त राहिल्याने त्या जागा भरण्यासाठी दुसरी यादी जाहीर करण्यात आलेली असून या दुसऱ्या यादीतील प्रवेशेच्छुक उमेदवारांनी दि. 12 जुलै 2022 रोजी सकाळी 10.00 वा. त्यांच्या जिल्ह्यासाठी असलेल्या विभागीय केंद्रावर उपस्थित राहून आपला प्रवेश अर्ज व मुळ कागदपत्रे तपासणी करून घ्यावयाची आहे. दिव्यांग उमेदवारांना स्वतः उपस्थित राहाता येत नसल्यास अन्य व्यक्तीला तसे अधिकार पत्र देऊन आपल्या कागदपत्रांसह अर्ज पडताळणी करिता संबंधित विभागीय केंद्रावर नियोजित दिवशीच पाठविणे बंधनकारक आहे.

पडताळणीसाठी जातांना पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

1) बी.एड प्रवेशासाठी Online अर्ज भरलेल्या प्रवेशेच्छूकांनी प्रवेशअर्ज पडताळणीसाठी विभागीय केंद्रावर नियोजित दिवशी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
2) प्रवेश अर्ज पडताळणीसाठी प्रवेशेच्छूकाने आपला प्रवेश अर्ज भरतेवेळी वापरलेला User Id व Password आणावा, त्याशिवाय आपल्या अर्जाची पडताळणी होणार नाही.
3) बी.एड. माहितीपुस्तिकेत दिलेल्या शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करणारेच उमेदवार बी.एड. कागदपत्र पडताळणीस पात्र असतील.

4) Online प्रवेश अर्जाची पडताळणी केलेलेच प्रवेश अर्ज बी.एड. प्रवेश 2022-24 साठी पात्र राहतील, जागा रिक्त राहिल्या तर पुढील उमेदवारांचे अर्ज गुणवत्ता यादीनिहाय पडताळणी करून प्रवेशास पात्र होतील.

5) विभागीय केंद्रामार्फत बी.एड. प्रवेशअर्ज कागदपत्र पडताळणी (Document Verification) न करणारे विद्यार्थी 2022-24 तुकडीच्या प्रवेश प्रक्रियेतून बाद होतील.

6) प्रवेश अर्ज पडताळणी करतांना संबंधितांनी पडताळणी समितीला प्रवेश अर्जात आपण भरलेल्या माहितीचे मूळ पुरावे सादर करणे बंधनकारक असेल, पुरावे सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

7) प्रवेश अर्जात पडताळणी वेळी केवळ भरलेल्या माहितीचीच पडताळणी होईल. त्यात कोणत्याही स्वरूपाच्या नवीन माहितीची भर घातली जाणार नाही ह्याची सर्व प्रवेशार्थींनी नोंद घ्यावी.

8) विभागीय केंद्रावर प्रवेश अर्ज पडताळणी दरम्यान शांतता राखावी. कोणत्याही प्रकारचा गोंधळ / गोंगाट निर्माण होणार नाही याची काळजी घेवून समितीला पूर्णत: सहकार्य करावे. कोविड-19 परिस्थितीचा विचार करता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारासोबत कोणीही येऊन गर्दी करू नये.

9) कागदपत्र पडताळणी समिती कक्षात फक्त उमेदवारांनाच प्रवेश करता येईल. उमेदवारांशिवाय अन्य नातेवाईकांना पडताळणी कार्य स्थळी प्रवेश दिला जाणार नाही.

10) उमेदवारांनी प्रवेश समितीवर कोणत्याही प्रकारचा दबाव, धमकी, जबरदस्ती, मारहाण, अपशब्द वापर, वाद घालणे, दस्तऐवज चोरी, सरकारी कार्यालयात गोंधळ अथवा अनधिकृत जमाव केल्यास भारतीय दंड सहिंतेनुसार (IPC) कार्यवाहीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

11) अर्ज पडताळणी शक्यतो यादीत दिलेल्या क्रमाने करण्यात येईल. परिस्थितीनुसार विभागीय केंद्र त्यात बदल करू शकतील व तो बदल सर्व उमेदवारांना बंधनकारक असेल.

12) प्रवेश अर्ज पडताळणीसाठी दोन तज्ज्ञांची समिती असेल. ती समिती प्रत्येक प्रवेशार्थीची वैयक्तिक माहिती, संपर्क माहिती, शिक्षक म्हणून अध्यापन अनुभव, एकूण सेवा, अर्हता, सामाजिक आरक्षण इ. तपशीलासंदर्भातील सर्व माहिती तुमच्या मूळ कागदपत्रांआधारे तपासणी करेल. त्या संदर्भातील सर्व मूळ कागदपत्रे व त्यांचा एक फोटोकॉपी संच सोबत

ठेवावा. फोटोकॉपी संच तुमचा प्रवेश अर्ज तपासणी नंतर तुमच्या Online अर्जासोबत जोडून समितीकडे दप्तरी ठेवण्यात येईल.

**अपेक्षित कागदपत्रे**

(क) बी.एड. प्रवेश अर्ज पडताळणी करतांना बी.एड. प्रवेश माहितीपुस्तिकेतील दिलेल्या महानगरपालिका आयुक्त/गटशिक्षणाधिकारी/शिक्षणाधिकारी/जिल्हा परिषद, प्रशासन अधिकारी/ मुख्यध्यापक ह्यांनी प्राथमिक शिक्षकांना दिलेले शिफारस प्रमाणपत्र पडताळणीस येतांना प्रत्येक प्रवेशार्थिनी भरून आणणे अनिवार्य आहे.

(ख) बी.एड. प्रवेश माहितीपुस्तिकेतील दिलेले मेंटार प्रमाणपत्र प्रत्येक प्रवेशार्थीने (शाळेतील वरिष्ठ शिक्षक) प्रवेश पडताळणी वेळी भरून आणणे अनिवार्य आहे.

(ग) Online संगणकीय मूळ अर्जाची प्रत.

(घ) डी.एड. तसेच प्रवेश अर्जात नोंदवलेल्या सर्व शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या मुळ व प्रमाणित सत्यप्रती.

(न) प्रवेश अर्जात नोंद केल्याप्रमाणे प्रत्येक विद्यालयातील सुरवातीपासून पुढील सर्व नेमणुकीच्या आदेशांच्या मूळ व प्रमाणित सत्यप्रती.

(त) मागासवर्गीय असल्यास पुढे नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रत व प्रमाणित सत्यप्रत.

- **अनुसूचित जाती (एस.सी.)** - जातीचा दाखला
- **अनुसूचित जमाती (एस.टी.)** - जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र
- **विमुक्त जमाती / भटक्या जमाती / इतर मागासवर्गीय / विशेष मागासवर्गीय** (VJ/NT/OBC/SBC)जातीचा दाखला, ऑनलाईन संगणकीय अर्जात नमूद केलेल्या नावाचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.
- **EWS** प्रवर्गाच्या उमेदवारांना शासन नियमानुसार वेळोवेळी निर्देशित केलेली प्रमाणपत्रे/दाखले / दस्तऐवज.

(ड) जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

(च) सर्व सेवेचे नेमणूक आदेश, शिक्षणधिकारी / शिक्षण उपसंचालक यांच्या शिक्षक किंवा पदमान्यता पत्राच्या सुरुवातीपासूनच्या सर्व साक्षांकित प्रती, शाळा मान्यतापत्र.

(छ) मेंटार (वरिष्ठ शिक्षक) मान्यता प्रमाणपत्र. (लागू असल्यास)

(ज) शाळा अनुदानित असेल तर वर्षनिहाय शाळा तपासणी अहवालाच्या साक्षांकित प्रती.

(न) नावात बदल असल्यास नाव बदल पुरावा म्हणून राजपत्र.

**महत्त्वाचे:**-आपण नोंदवलेल्या अध्यापन अनुभवाचा पुरावा म्हणून आपली मूळ सेवा पुस्तिका / सेवा ऑर्डर इन्स्पेक्शन रिपोर्ट इ. पैकी किमान एका मूळ दस्त ऐवजाची प्रत तुमच्याकडे असणे बंधनकारक आहे. समितीला मूळ कागदपत्र तपासतांना शंका निर्माण झाल्यास त्या मुद्यासंदर्भात दुसऱ्या पुराव्याची मागणी समिती करेल. त्यावेळी तात्काळ तुम्ही तो सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे मूळ सेवा पुस्तिका व सेवा ऑर्डरच्या सर्व प्रती सोबत ठेवाव्यात.

12)कोणत्याही आरक्षणाचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे शासन नियमानुसार जातीचा दाखला, जात वैधता व ना सायस्तर (नॉन क्रिमीलेअर) दाखला इ. शासन नियमानुसार आवश्यक ते दस्तऐवज असणे बंधनकारक आहे.

13) सामाजिक आरक्षणासंदर्भात लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे खालीलप्रमाणे पुरावे असावे.

- **दिव्यांग :** दिव्यांग असल्याबाबतचे शासन निर्णयानुसार सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.
- **प्रकल्पग्रस्त :** जिल्हा पुनर्वसन अधिकारी / सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र, परंतू त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
- **आपत्तीग्रस्त :** उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांचे प्रमाणपत्र, परंतू त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक.
- **स्वातंत्र सैनिक पाल्य :**सैनिकाची पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांनी स्वातंत्र्यसैनिकाच्या ओळखपत्राची प्रत व पाल्याच्या नातेसंबंधाचा पुरावा.
- **आजी / माजी सैनिक पाल्य:**सैनिकाची पत्नी / मुलगा / अविवाहित मुलगी यांनी जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र आवश्यक. नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक, डिस्चार्ज पुस्तक आवश्यक.
- **विधवा :** महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त झालेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.
- **घटस्फोटीता :**विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लिम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी / इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र. ते प्रमाणपत्र नोटरी करून मराठी भाषेत भाषांतर करून आणणे आवश्यक.

- **गोवा -बेळगाव बिदर :** हा मराठी भाषिक प्रदेश असल्याने या उमेदवारांनी नियुक्ती आदेश व अनुभवाचे दाखले हे मराठी / हिंदी / इंग्रजीत आणावे व त्यावर संबधित अधिकारी / मुख्याध्यापकाची सही व शिक्का आणणे अनिवार्य. प्रवेश अर्ज पडताळणी वेळी वरील मूळ व साक्षांकित (Attested)प्रमाणपत्रांआधारे आपल्या प्रवेश अर्जातील माहितीची सत्यता पडताळून पाहण्यात येईल. त्यामुळे उपरोक्त आवश्यक ती कागदपत्रे तुमच्या जवळ नसल्यास Online प्रवेश अर्जातील माहितीत बदल करण्यात येतील.

14) प्रवेश अर्जाप्रमाणे कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर पुढील प्रवेशसुचना आणि याद्या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील, त्या सूचना पाहणे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे प्रवेशेच्छुकांची जबाबदारी राहील.

15) अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट देत राहावी.

संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

कुलसचिव तथा अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक